(बोधचिन्ह) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 18

नागरवस्ती विकास योजना विभाग

जाहीर_प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या, नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ◌ंमहिला व बालकल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, आधारनिधी योजना आणि अपंग व्यक्तींच्या विकासाच्या योजना राबविण्यात येत आहेत. त्यानुसार 2013-14 या आर्थिक वर्षाकरिता खालीलप्रमाणे नमुद केलेल्या घटक योजनाचा लाभ घेणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील संबंधीत घटकातील अर्जदाराकडुन दिनांक /09/2013 ते दिनांक /09/2013 या कालवधीत विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जदारांनी आपले अर्ज वास्तव्यास असलेल्या ठिकाणानजीकच्या महापालिकेच्या अ,ब,क,ड प्रभाग कार्यालयातील 'नागरी सुविधा केंद्रात' सादर करावेत.

महिला व बाल कल्याण योजना

| अक्र | योजना | पात्रता अटी | इतर महत्वाचे अटी |
|---|---|---|---|
| 1 | ***परदेशातील उच्च शिक्षणासाठी निवड झालेल्या युवतीस अर्थसहाय्य*** | ***१)परदेशातील उच्च शिक्षणासाठी निवड झाल्याबाबतची कागदपत्रे सादर करावी लागतील.***<br>***२) उत्पन्नाची अट शिथिलक्षम*** | 1) लाभार्थीचे वास्तव्य पिंपरी चिंचवड मनपा हद्यीत असलेबाबत ***आधारकार्ड सत्यप्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.***<br>2) कुंटुंबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न र.रु.1,00,000/- पेक्षा कमी असलेबाबत मा.तहसिलदार यांचा दाखला किंवा रेशनिंग कार्डवरील उत्पन्न ***पुरावा सादर करणे आवश्यक.***<br>3).अर्थसहाय्यच्या योंजनांकरीता अर्जदाराच्या नावे बँकेमध्ये असलेल्या बचतखात्याच्या पासबुक व ECS संबंधित कागदपत्रांच्या प्रती व बँकेच्या शिफारसीसह जोडणे आवश्यक राहील. |
| 2 | ***पहिल्या मुलीवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-या अथवा पहिली मुलगी असताना दुसरी मुलगी झाल्यास दुस-या मुलीवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-या*** | ***१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत मागील तीन वर्षापासून वास्तव्य असणे आवश्यक राहील***<br>***२) अर्जदार महिलेने पहिली मुलगी असताना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेली असावी. किंवा पहिली मुलगी असताना दुसरी मुलगी अपत्य*** | वरीलप्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | *महिलेस अर्थसहाय्य* | *झाल्यानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेली असणे आवश्यक राहील त्याकरीता संबंधित रूग्णालयाकडील वैद्यकीय प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.*<br>*३) मुलीचा जन्म आणि मातेची कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया १ जानेवारी २००७ नंतर झाल्यास लाभ देय राहील.*<br>*४) सदर अर्थसहाय्याची संपुर्ण रक्कम बालिका सज्ञान झाल्यानंतर तिला मिळेल असा पध्दतीने अर्जदार माता व संबंधित बालिका यांच्या संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेडील मुदत ठेव पावती स्वरूपात देण्यात येईल.* | |
| 3 | *मुलगी दत्तक घेणा-या दांपत्यास अर्थसहाय्य देणे.* | *१) अर्जदार कुटुंबाचे/दांपत्याचे वास्तव्य किमान मागील तीन वर्षापासुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये असणे आवश्यक राहिल.*<br>*२) अर्जदार कुटुंबाचे/दांपत्यांने कायदेशीर दत्तक विधान करून मुलगी दत्तक घेतलेली असणे आवश्यक रहील त्या बाबतचे कोर्टाकडील दत्तक विधानाची सत्यप्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.*<br>*३) सदर अर्थसहाय्याची संपुर्ण रक्कम बालिका सज्ञान झाल्यानंतर तिला मिळेल अशा पध्दतीने अर्जदार महिला व संबंधित बालिका यांच्या संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेकडील मुदत ठेव पावती स्वरूपात देण्यात येईल.* | वरीलप्रमाणे |
| 4 | अस्तित्व पुनर्वसन योजना | 1) अर्जदार महिलेचे वय 21 वर्षापेक्षा कमी नसावे.<br>2) महिला अत्याचारीत, पिडीत असलेबाबत पोलिस निरिक्षक यांचा अहवाल, एफ.आय.आर.ची प्रत सादर करणे आवश्यक राहील. | वरीलप्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील युवतींना हवाई सुंदरी (Air Hostess) प्रशिक्षणाकरीता अर्थसहाय्य | **1)** लाभार्थी इयत्ता 12 वी उत्तीर्ण असणे आवश्यक<br>**2)** लाभार्थी हा वय वर्ष 18 ते 23 या गटातील असावा<br>**3)** शासन मान्यता प्राप्त तसेच नामांकित विमान कंपनीशी सलग्न असलेल्या व सिम्यूलेटरची सुविधा असलेल्या आणि शासकीय विभागात अशा प्रकारचे प्रशिक्षण ादेण्याचा अनुभव असलेल्या प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेतलेला असावा.<br>**४)** लाभार्थीने प्रशिक्षण फी च्या 10% रक्कम मनपा कोषागारात भरणे आवश्यक राहील.<br>**५)** अर्जदाराने उत्पन्नाबाबत मा. तहसीलदार यांतेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक.<br>अर्जदाराने प्रशिक्षण संस्थेच्या शिफारशीसह अर्ज या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. | ***वरीलप्रमाणे*** |
| ***६*** | ***नोंदणीकृत महिला संस्थांना पाळणाघर सुरु करण्यासाठी अर्थसहाय्य*** | १) ***महिला संस्था/मनपाकडील नोंदणीकृत अनुदान प्राप्त महिला बचतगटांना किमान १ वर्ष संस्था बचतगट कार्यरत असणे आवश्यक व बचतगट असेल तर तो मनपाकडील नोंदणकृत असणे आवश्यक राहील.***<br>२) ***५ वर्षे वयाच्या आतील किमान १५ बालकांना प्रवेश दिलेला असावा.*** | ---- |
| ***७*** | **महानगरपालिका हद्दीतील तीन वर्षे पूर्ण झालेल्या महिला बचतगटास व्यवस्थापन व बळकटीकरणासाठी अर्थसहाय्य देणे** | १) ***माहे एप्रिल २००९ ते जुलै २०१० अखेर पर्यंत किंवा त्यापूर्वी स्थापन झालेल्या व यापूर्वी अनुदान घेतलेले नाही अशाच बचतगटांनी अर्ज करावेत,***<br>२) ***मागील तीन वर्षामध्ये बचतगट*** | ----- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ***कार्यरत असणे आवश्यक आहे. त्याकरिता माहे जुलै २०१३ अखेर पर्यंत बँकेकडील सर्व नोंदी असलेल्या पासबुकची झेरॉक्स, हिशोब पुस्तक, मासिक सभांच्या इतिवृत्तांत प्रति सादर करणे आवश्यक राहील.***<br>३) ***बचतगटातील प्रत्येक महिला सभासदांचे आधारकार्डाची प्रत सादर करावी लागेल.***<br>४) ***ज्या बचतगटांनी पूर्वी अर्ज केलेले आहेत परंतु अर्थसहाय्य मिळालेले नाही अशा बचतगटांनी देखील नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे.*** | |

## अपंग व्यक्तींच्या विकासाच्या योजना

| अ. क्र. | योजना | सर्वसाधारण पात्रता अटी व शर्ती | इतर महत्वाच्या अटी व शर्ती |
|---|---|---|---|
| 1 | *अंध, अस्थिव्यंग, मुकबधिर,* अनाथ *विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप.* | विद्यार्थी ज्या संस्थेत, महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत त्यांचेमार्फत अर्ज सादर करावा लागेल अथवा ***महापालिका हद्दीत कार्यरत किमान १ वर्षे नोंदणीकृत असलेल्या अनाथाश्रम, ,निराधारांचे*** संस्थेमार्फत ***अर्ज सादर कर***णे आवश्यक राही***ल***<br>२) अनाथ/निराधारांचे बाबतीत संस्थेत निवासास असलेल्या विद्यार्थ्यांनी संस्थेचे निवासासंबंधी प्रमाणपत्र निराधार पुरावा सस्थेने देणे गरजेचे सदरचा धनादेश संस्थेचे नांवे अदा करण्यात येईल<br>3) विद्यार्थी मागीलवर्षाच्या परिक्षेत उत्तीर्ण झाला असला पाहिजे<br>4) अनाथ/निराधाराचे बाबतीत संस्थेस आणि इतरांचे बाबतीत पालकांचे नावे धनादेश अदा करण्यात येतील. | 1).अर्जदाराने पिंपरी-चिंचवड मनपा हद्दीत वास्तव्य असलेबाबत ***आधारकार्ड सत्यप्रत*** अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.<br>२) अर्जदाराचे अपंगत्वाबाबत 40% अथवा त्यापेक्षा अधिक अपंगत्वाचे शासकीय रूग्णालयाकडील प्रमाणपत्र सादर करणे ेआवश्यक राहील. |
| 2 | कुष्ठ पिडीत अपंग व्यक्तींकरीता सहामाही/वार्षिक अर्थसहाय्य योजना. | 1) 40% अथवा त्यापेक्षा अधिक कार्यात्मक/क्रियात्मक (functional) अपंगत्वाबाबतचे शासकीय रुग्णालयाकडील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.<br>2) सदरचे अर्थसहाय्य हे पात्र अर्जदार व्यक्तीस वार्षिक अथवा सहामाही स्वरुपात | वरीलप्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देणेत येईल.<br>3) बी.पी.एल.यादीत नांव असलेबाबतचा पुरावा अथवा र.रु.1,00,000/- चे आंत तहसिलदाराकडील उत्पन्नाबाबतचा पुरावा आवश्यक.<br>4 **अर्जदाराचे वय १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहील**<br>5) यापूर्वी अर्ज केलेल्या व अर्थसहाय्य मिळणाऱ्या लाभार्थींनी पुन्हा अर्ज करु नयेत. | |
| 3 | महापालिका हद्दीतील अपंग/मतिमंद/ मुकबधिर नागरीकांना पी.एम.पी.एम.एल.चे पासेस मोफत देणे. | 1) सदरचा लाभ फक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्य असणाऱ्या अपंग/मतिमंद/ मुकबधिर नागरीकांना देय राहील.<br>2) शासकीय रुग्णालयाकडील किमान 40% अथवा त्यापेक्षा अधिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक. | वरीलप्रमाणे |
| 4 | महापालिका क्षेत्रातील 05 वर्षांपुढील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणा-या महापालिका हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तींच्या पालकांस अर्थसहाय्य. | 1)सदर अर्जदार संस्थेने मतिमंद व्यक्तींकरीता आवश्यक सुविधा देणे आवश्यक राहील.<br>2) संस्था नोंदणी अधिनियम,1960 अन्वये नोंदणीकृत असणे आवश्यक राहील.<br>3) सदर संस्थेमधील प्रवेश घेतलेल्या मतिमंद व्यक्तींच्या बाबत काही कायदेशीर प्रश्न उपस्थित झाल्यास तसेच संस्थेने नेमणूक केलेले मानसेवी कर्मचा-याबाबत अथवा इतर काही कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याबाबत संबंधित संस्थेची त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी राहील.<br>4) सदर योजनेचा लाभ मतिमंद व्यक्तींचा घरामध्ये साभांळ करणाऱ्या पालकांनाही घेता येईल.<br>5) प्रत्येक मतिमंद व्यक्तीचे बाबत स्वतंत्र अर्जावर पालकाची समंती आवश्यक राहील. तसेच 15 पेक्षा कमी मतिमंद असणाऱ्या संस्थांच्या बाबत सदरचा लाभ पालकांच्या नावे देण्यात येईल.<br>6) यापूर्वी अर्ज केलेल्या व अर्थसहाय्य मिळणाऱ्या लाभार्थींनी पुन्हा अर्ज करु नयेत. | वरीलप्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | **अपंगांना मोफत चलन वलन साधने वाटप.** | **१)लाभार्थीला बहिरेपणा असल्यास प्रमाणित ऑडिओग्राफ अहवाल अर्जासोबत जोडावा लागेल.** २)जेष्ठ नागरिकांकरीता (65 वर्षे पुढील) 70% बहिरेपणा असल्यास श्रवणयंत्रास पात्र ठरतील. | वरीलप्रमाणे |
| 6 | महापालिका हद्दीतील अंध,अपंग, मुकबधिर व्यक्तींना व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे. | 1)व्यवसायासाठी लागणारे भांडवल, जागा, मशिनरी (विद्युत,पाणी,खर्च) बाजार पेठ इत्यादींचा विचार करुन प्रकल्प अहवाल तयार करुन तो जिल्हा उद्योग केंद्रामार्फत तपासून घेवून शिफारशीसह प्रथम बँकेकडे सादर करुन कर्ज मंजुरीचे पत्र व जिल्हा उद्योग केंद्राचे अहवालासह महापालिकेकडे सादर करणे आवश्यक राहील.<br>2) व्यवसायासाठी लागणारी जागा अर्जदाराच्या स्वत:च्या मालकीची असावी किंवा जागा भाडयाची असल्यास पाच वर्षांचा मा.उपनिबंधक यांचेकडील भाडे करारनामा तसेच विद्युत मंडळाची परवानगी तसेच शॉप अँक्ट एस्टॅब्लिशमेंट विभागाची परवानगी घेणे आवश्यक राहील.<br>3) एकापेक्षा अधिक अंध, अपंग, मुकबधिर व्यक्तींनी एकत्रित व्यवसाय सुरु केल्यास बँकेकडील मंजूर प्रकल्प खर्चाच्या 50% अथवा जास्तीत जास्त प्रति लाभार्थी र.रु. 1,00,000/- प्रमाणे एकूण लाभार्थी संख्या विचारात घेवून त्याप्रमाणात अर्थसहाय्य अनुदान स्वरुपात अदा करण्यात येईल. अशा प्रकारचे अर्थसहाय्य फक्त एकदाच देण्यात येईल. | वरीलप्रमाणे |

## <u>मागासवर्गीय कल्याणारी योजना</u>

| अ | योजना | पात्रता अटी | इतर महत्वाचे अटी |
|---|---|---|---|
| **1** | इयत्ता 5 वी 10 वी मधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | 1) खाजगी व शासकीय व खाजगी शाळेतील इयत्ता 5 ते 10 मधील 45 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करणे आवश्यक, त्याबाबतची मार्कशीट सादर करणे आवश्यक | 1) अर्जदार विद्यार्थ्यांचा अथवा पालकाचा मा.उपजिल्हाधिकारी यांचेकडील (अनु जाती अनु जमाती, विमुक्त जाती व भटकी जमात) या जातींचा दाखला सादर करणे आवश्यक<br>2) लाभार्थीचे वास्तव्य पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत असलेबाबत |

14

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आधारकार्ड ***सत्यप्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.*** |

वरील सर्व घटक योजनांचे विहित नमुन्यातील अर्ज व योजनेबाबतचा इतर सर्व तपशील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चारही प्रभाग कार्यालयातील “नागरी सुविधा केंद्रामध्ये” (आधार केंद्रामध्ये) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दिलेल्या मुदतीस सकाळी 11 ते दु. 4 या वेळेत उपलब्ध होतील. अर्जात नमुद केलेल्या विभागाकडील मंजूर धोरणानुसार अर्जामध्ये अटी व शर्तीनुसार आवश्यक प्रमाणित कागदपत्रे जोडल्याशिवाय तसेच अपुर्ण भरलेले /अपात्र तसेच मुदतीनंतरचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज सादर करताना अर्जदाराने मुळ कागदपत्रे तपासणीकामी अर्जदाराने स्वत: आणणे आवश्यक आहे. अर्ज स्विकारताना नागरी सुविधा केंद्रामार्फत प्रत्येक अर्जाकरीता र.रु.10/- (रुपये दहा फक्त) शुल्क आकारण्यात येईल.

टिप - अर्थसहाय्याच्या योजनेअंतर्गत लाभाकरीता संबंधित लाभार्थीचे नांवे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये असलेल्या बचतयाद्यांचे पासबुक , खाते क्रमांक व **ECS** बाबत बँकेकडील पुरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक. ***तसेच अर्जदारांचे आधारकार्डची सत्यप्रत सादर करणे आवश्यक राहील.***

1) अर्ज वाटप दिनांक :- /9/2013 ते दिनांक : / 9 /2013 अखेर
2) अर्ज स्विकृती दिनांक - /9/2013 ते दिनांक / 9 /2013 अखेर

**सही/-**
आयुक्त
पिंपरी चिंचवड **महानगरगरपालिका**
पिंपरी - 411 018.

सहाय्यक आयुक्त
नागरवस्ती विकास योजना विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 18.